**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ,मुंबई शहर.**
Office of the Collector & District Magistrate Mumbai City
**ओल्ड कस्टम हाऊस,शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट,मुंबई - ४०० ००१**
Old custom House, Shahid Bhagatsingh Marg, Mumbai-400 001.
EMAIL : lekha.collmum@gmail.com Tel - 22652622

क्र.लेखा/टे-4/सी.सी.टी.व्ही.कॅमेरा/दे.दु.क./2018
दिनांक- 28/12/2018

# प्रसिध्दी पत्रक

**विषय- कार्यालयातील 35 सी.सी.टी.व्ही. कॅमेरा देखभाल दुरूस्ती करार करण्याकरीता स्थानिक खुल्या बाजारातून दरपत्रके मागविणेबाबत.**

उपरोक्त विषयानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयातील 35 सी.सी.टी.व्ही. कॅमेरा देखभाल दुरूस्ती करार करण्याकरीता स्थानिक खुल्या बाजारातून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रक सादर करावयाचा शेवटचा दिनांक सुचना/प्रसिध्दीपत्रक निर्गमित झाल्यापासून 7 दिवसांच्या आत सायं. 5.00 वाजेपर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) मा. निवासी उपजिल्हाधिकारी (लेखा शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, 1 ला माळा, ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई-400001 यांचे नावे सिलबंद लिफाफा मध्ये वरीलप्रमाणे खरेदीकरीता दरपत्रके हस्तपोच किंवा टपालाने सादर करण्यात यावी. दिलेल्या मुदतीनंतर दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत तसेच निम्नतम दर असलेल्या संस्थेला दरपत्रक स्वीकृतीबाबत व पुरवठा करणेबाबत पत्रान्वये कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

21.12.2018

**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर.**

सोबत:- अटी व शर्ती.

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, राष्टीय सूचना व माहीती केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांना सदर सुचना किंवा प्रसिध्दी पत्रक कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता अग्रेषित.

# अटी व शर्ती

1. सी.सी.टी.व्ही कॅमेरा दुरूस्ती व सेवा संविदा करार हा करार झाल्याच्या दिनांकापासून 1 वर्षापर्यंत वैध राहील.
2. आपणाला कार्यालयीन वेळेत सकाळी 9.45 ते सायंकाळी 5.30 पर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) सेवा पुरविणे बंधनकारक राहील.
3. आपणाकडून करण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही दुरूस्तीबाबतचा तसेच सर्व सी.सी.टी.व्ही कॅमेरा सुस्थितीत आहे किंवा कसे? याबाबतचा अहवाल दर 15 दिवसांनी कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच दुरूस्ती केल्याबाबतचा अहवाल त्याच दिवशी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
4. सी.सी.टी.व्ही. कॅमेरा दुरूस्तीकरीता कार्यालयाकडून दूरध्वनी किंवा पत्राव्दारे कळविलेनंतर तात्काळ दुरूस्ती करून देण्यात यावी.
5. सी.सी.टी.व्ही. कॅमेरा दुरूस्ती संबंधात नवीन पार्ट खरेदी करणे गरजेचे असल्यास सदर पार्ट खरेदी करून दुरूस्ती करून देण्यात यावी व तसे दुरूस्ती केल्याबाबतचा अहवाल त्याच दिवशी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. त्यासाठी झालेल्या खर्चाचे देयक यथावकाश कार्यालयास सादर करणेत यावे.
6. या कार्यालयास आपली सेवा समाधानकारक न मिळाल्यास सदरचा दुरूस्ती व सेवा संविदा करार मुदतीपूर्वीच रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर या कार्यालयास राहील.
7. कार्यालयाकडून सी.सी.टी.व्ही फुटेज मागितल्यास तात्काळ कार्यालयास उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.
8. कार्यालयात कार्यान्वित असलेले सर्व सी.सी.टी.व्ही कॅमेरे करार झाल्यापासून दोन दिवसात सुरळीत चालू करून देणे संस्थेस किंवा आपणास बंधनकारक राहील.
9. उद्योग संचलनालय, माहिती तंत्रज्ञान संचलनालय किंवा शासनाकडून सी.सी.टी.व्ही कॅमेरा दुरूस्ती व सेवा संविदा करार व तद्नुषंगिक खरेदी संदर्भात कोणत्याही संस्थेसोबत दरकरार लागू करण्यात आला किंवा शासनाकडून सदर खरेदीबाबत ऑनलाईन प्रक्रिया करण्याबाबत सुचित करण्यात आल्यास त्या दिवसापासून दरपत्रधारकांबरोबर (व्यक्ती/कंपनी) केलेला करार संपुष्टात येईल.

21.12.2018

**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई शहर.**